# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/07/2023 (शुक्रवार) दुपार

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०.५ किमी अंतरावर सत्रापुर, कन्हान येथे दिनांक २०/०७/२०२३ चे १३/०० वा. ते १३/०५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– युवराज भिमराज गायकवाड, वय २८ वर्ष, रा. सत्रापुर कन्हान याच्या भावाचा मुलगा नामे– आरूश जयराज गायकवाड याला **आरोपी नामे– १) भेडण सतीदर पुरवले, वय ५० वर्ष २) साहील भेडण पुरवले, वय २२ वर्ष, ३) देवेन भेडण पुरवले, वय २४ वर्ष, ४) सतिश उमराव सोनबर्से, वय २१ वर्ष, सर्व रा. सत्रापुर कन्हान** यांनी शिवीगाळ केली होती. तो रडत रडत घरी आला फिर्यादीचे भावाने जयराजने त्याला विचारले असता त्यांनी आरोपीचे नाव सांगीतले असता आरोपीकडे फिर्यादी व त्यांचा भाऊ जयराज विचारपुस करणेकरीता गेले असता आरोपी क्र. १) याने त्यांच्या जवळील ब्लेडने फिर्यादीचे पाठीवर उजव्या बाजुने मारून जखमी केले तसेच फिर्यादीचा भाऊ जयराज याने आरोपी क्र. १) व ३) यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता आरोपी क्र. १) २) व ४) याने जयराजला पकडुन ठेवले व आरोपी क्र. ३) जवळ असलेला धारदार चाकुने जयराजचे पोटावर वार करून जखमी केले फिर्यादीचा भाऊ जयराज भिमराज गायकवाड गंभीर जखमी झाल्याने, त्यास उपचाराकरीता कामठी येथील रॉय हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी उपचार करून उपचारा दरम्यान मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. दि. २०/०७/२०२३ चे १८.३० वा. सा. क्र. ४६/२०२३ अन्वये कलम ३०७, ३४ भा.दं.वि. ऐवजी कलम ३०२ भादंवि. अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राजेश जोशी, पो.स्टे. कन्हान मो. नं ७८७५९६६६७६ हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत मौजा तिष्टी (खूर्द) येथे दिनांक १३/०७/२०२३ चे १८/०० वा. दि. १७/०७/२०२३ चे १६/३० वा. सुमारास फिर्यादी नामे– अनुराग कोठीराम जिवतोडे, वय २५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ भारती ले आऊट सावनेर यांची मौजा तिष्टी (खूर्द) येथे शेती आहे. त्या शेतामध्ये शेती उपयूक्त साहीत्य ठेवण्याकरीता टिणाचा पॅक बंद गोठा बांधलेला आहे. त्यामध्ये शेतात वापरणारे साहित्य फवारणी यंत्र व वखराचा फास व इतर सामान ठेवले होते व बाजूला ट्रॅक्टर व रोटावेटर व इतर सामान ठेवण्याकरीता टिणाचे शेड उभारलेले आहे. दि. १३/०७/२०२३ रोजी फिर्यादी हे शेतात गेले असता तर टिनाचे गोठयामध्ये ठेवलेले फवारणी यंत्र व वखराचा फास ठेवले होते ते तिथेच होते त्यानंतर फिर्यादी टिणाच्या गोठ्याला कूलुप लावून सांयकाळी ०६/०० वा. मौजा तिष्टी शिवारातून सावनेरला घरी परत आले. त्यानंतर दि. १७/०७/२०२३ रोजी ०४/३० वा. दरम्यान फिर्यादी शेतात गेले तर टिणाच्या गोठ्याला लावलेले कूलुप तूटलेले दिसले त्यामुळे फिर्यादीने गोठ्यात आत जाऊन पाहीले तर गोठ्यात ठेवलेले फवारणी यंत्र किंमती अंदाजे ३०००/–रू. वखराच्या ०४ फास किंमती अंदाजे २०००/–रू. असा एकूण ५०००/– रूपयाचा मुद्देमाल **आरोपी नामे –किशोर नेहारे, रा. तिष्टी (बू)** याने मित्राच्या मदतीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक कामटे पोस्टे केळवद हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर